

संत शिरोमणी
रविदास महाराज

मन चंगा तो कठोती में गंगा !

संपादकीय सल्लागार : मा. पंढरीनाथ पवार

ई-मासिक

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मुखपत्र

# अधिकृत RCM



आशिर्वाद

मा.श्री.बबनराव (नाना) घोलप
माजी समाजकल्याण मंत्री, महाराष्ट्र

adhikrutrcm@gmail.com वर्ष : १, अंक : १, सप्टेंबर २०२०, पाने : ४ संपादक : डॉ. शांताराम पां. कारंडे



## राष्ट्रीय चर्मकार महासंघ

(महाराष्ट्रीय चर्मकार संघ)

प्रति,
मा. डॉ. शांताराम कारंडेजी,

सस्नेह जय रविदास!

राष्ट्रीय चर्मकार महासंघ ही सामाजिक संघटना आज देशपातळीवर वाढत असताना पाहून मनाला समाधान वाटते. ज्या संघटनेची मुळे मी रोवली त्या संघटनेचा वटवृक्ष पाहून आयुष्याचे सार्थक झाल्यासारखे वाटते. राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत असताना गावोगावी-खेडो पाडी आपला समाज एकत्र येत असतानाचे पाहून ज्या उद्देशासाठी मी संघटना स्थापन केली तो उद्देश सफल झाल्याची भावना मनात निर्माण झाली. आज देशभर संघटनेचे जाळे पसरत आहे. अनेक जण आपल्यासोबत जोडले जात आहेत.

एकविसाव्या शतकाच्या दिशेने आपण सरकत असताना निश्चितच होणाऱ्या बदलांना आपण अंगिकारले पाहिजे, नवीन युगाची माहिती घेऊन त्याचा वापर करायला हवा ही भावना ठेवूनच आपण राष्ट्रीय चर्मकार महासंघाची स्वतःची वेबसाईट सुरू करत आहोत. ही बाब निश्चितच अभिमानाची म्हणायला हरकत नाही. कारण आपली एकमेव संघटना आहे ज्या संघटनेची वेबसाईट सर्वप्रथम निर्माण होत आहे. या वेब पोर्टलच्या माध्यमातून आपण तळागाळातील अनेक समाजबांधवांसोबत जोडले जाणार आहोत. आपल्या अधिकृत नियुक्त केलेल्या पदाधिकाऱ्यांच्या नावाची यादी त्यांच्या माहितीसहित समाजाला मिळणार आहे.

हा बदल होत असताना व अनेक चर्मकार बांधव नव्याने आपल्या संघटनेला जोडले जात असताना मी समाजाची कामे त्वरित होण्यासाठी नवीन १२ विभागांची रचना केली. त्या विभागांपैकी एक विभाग म्हणजे प्रचार व प्रसार माध्यम ज्याची जबाबदारी मी आपल्यावर सोपवलेली आहे. ती जबाबदारी ओळखुन आपण सर्वात आधी कामाला सुरुवात केली. आपले अभिनंदन !!

आपण या विभागाच्या माध्यमातून एक नवीन उपक्रम म्हणून निश्चितच चांगला निर्णय घेतला आहे. आपण अधिकृत RCM या ई-मासिकाची सुरुवात करून संघटनेला मजबुती देण्याचे कार्य करत आहात. त्यामुळे तुमची या ई-मासिकाच्या संपादक पदी आपली नियुक्ती करताना मला आनंद झाला आहे. तसेच मी आपणास राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मुखपत्र म्हणून प्रकाशित करण्याची परवानगी देत आहे. आपण सर्व जबाबदाऱ्या ओळखून काम कराल ही अपेक्षा! सर्व हक्क आपणांस सोपविले आहेत त्याची आपली जबाबदारी आपण समर्थपणे पार पाडाल याची खात्री आहेच, २४ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या आपल्या संघटनेच्या २६ व्या वर्षात यशस्वी पदार्पणानिमित्त तुम्हा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

आपला,

बबन घोलप
संस्थापक व अध्यक्ष

## || मन चंगा तो कठौती में गंगा ||

ज्याचे मन पवित्र असते, त्याच्या बोलविण्याने देशातील सर्वात मोठी नदी गंगा ही चामडे भिजविण्याच्या एका छोट्या पाणी भरलेल्या कटोऱ्यात येऊ शकते.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या प्रचार व प्रसार विभागाच्या

### मुख्य कॅबिनेट सल्लागार पदी डॉ. शांताराम कारंडे यांची नियुक्ती

**नाशिक (प्रतिनिधी) :** राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा संस्थापक व अध्यक्ष मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांनी आपल्या संघटनेच्या प्रचार व प्रसार माध्यम या विभागाच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. सदर विभागाची महाराष्ट्र कॅबिनेट सल्लागार सदस्य समिती खालीलप्रमाणे असेल.

**मुख्य कॅबिनेट सल्लागार :**
डॉ. शांताराम पां. कारंडे : मुंबई

**कॅबिनेट सल्लागार सदस्य :**
मा. श्री. रोहिदास बनसोडे, बीड
मा. श्री. जयवंत बामणे, मुंबई
मा. डॉ. गणेश बोरकर, अकोला
मा. श्री. पांडुरंग बाविस्कर, जळगाव
मा. श्री. ज्ञानेश्वर बसेशंकर, नागपूर, मा. श्री. मारुती शिवदास, सातारा हे नवनियुक्त समिती सदस्य व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे चर्चा करून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामध्ये/तालुक्यात आपापल्या विभागाच्या नियुक्त्या करतील असे स्पष्ट करत बबनराव घोलप यांनी सर्व सदस्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## महासंघाच्या विभागवार नियुक्त्या जाहिर

**नाशिक (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ ही देशातील सर्वात मोठी चर्मकार संघटना म्हणून नावारूपाला आलेली आहे. आपल्या संघटनेबद्दल गावो- गावी, खेडोपाडी चांगला संदेश गेलेला आहे. महाराष्ट्रात असे कोणतेही गाव नाही जेथे आपली संघटना पोहोचली नाही. तळागाळातील समाज बांधवांची सेवा करता यावी म्हणून आपल्या समाजाचे संघटन व्हावे, आपला समाज एकत्र यावा..! हाच आपला मुख्य हेतू आहे.

हा हेतू साध्य करण्यासाठी तसेच चर्मकार समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी, त्यांना आपल्यात सामील करून घेण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या मुख्य प्रवाहासोबत एकूण ११ विविध विभागाची निर्मिती व बांधणी करीत आहोत.

या विशेष कामासाठी अत्यंत तातडीची कोअर कमिटी बैठक रविवार दि. ९ ऑगस्ट २०२० रोजी स. ठीक ११.३० वाजता राष्ट्रीय अध्यक्ष मा.श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय कँटीन सभागृह, नाशिक या ठिकाणी पार पडली. सदर बैठकीत राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वाढीसंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. त्या चर्चेनुसार राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या अंगीकृत विभागाच्या स्थापना करण्यात आल्या. हे विभाग स्वतंत्ररित्या आपले काम करतील, मात्र ते करत असताना मुख्य प्रवाहातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना

पान ३ वर

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राज्यस्तरीय ऑनलाईन अधिवेशन

**नाशिक (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, माजी समाजकल्याण मंत्री, क्रांतिकारी नेते, चर्मकार हृदय सम्राट मा. श्री. बबनराव (नाना) घोलप साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दि. २६ जुलै २०२० रोजी सकाळी ११.३० वा. राज्यस्तरीय आनलाईन अधिवेशन पार पडले.

सदर ऑनलाइन अधिवेशनाला बरोबर ११.३० वा. सुरुवात होऊन अत्यंत शिस्तीत प्रत्येकाने आपापले मत अगदी थोडक्यात मांडले. समस्त चर्मकार समाजाच्या नवीन समस्या, गटई चर्मकारांचे प्रश्न व चर्मकार समाजाच्या विकासाची दिशा ठरविणारी ही बैठक ठरली.

सदर अधिवेशन शिस्तीने पार पडेल याची काळजी प्रत्येकाने आवर्जून घेतली. आदरणीय नानांनी आखलेल्या रुपरेषेबाहेर कुणीही न जाता राष्ट्रीय चर्मकार महासंघाने शिस्तीचा एक नवा इतिहास रचला. आदरणीय नानांनी पदाधिकाऱ्यांना उद्देशून केलेल्या भाषणात महाराष्ट्रातील प्रत्येक विभागवार संत शिरोमणी रविदास भवनाकरिता जागा उपलब्ध करून तसा आराखडा व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयास देण्याच्या सूचना केल्या. तसेच चर्मकार सहकारी संस्था स्थापन करून त्याचा पाठपुरावा करण्याचे सांगितले. मंगळवार दि. १४ जुलै २०२० रोजी प्रत्येक जिल्ह्यात दिलेल्या निवेदनाचा पाठपुरावा करून गरीब गटई चर्मकाराला न्याय मिळवून देण्याचा आदेश दिला. लॉक डाऊन मध्यें प्रत्येकाने आपल्या समाज बांधवाला केलेल्या मदतीचे, सहकार्याचे कौतुक करून यापुढेही असेच कार्यरत राहण्याचा विश्वास व्यक्त केला.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाची शिस्त पाळत हे ऑनलाइन अधिवेशन यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी विशेष मेहनत घेतली. या अधिवेशनाला राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व अध्यक्ष मा. श्री. बबनराव (नाना) घोलप, माजी समाज कल्याण मंत्री यांच्यासहित पंढरीनाथ पवार - राष्ट्रीय सल्लागार, भानुदास विसावे - राष्ट्रीय कार्याध्यक्ष, ज्ञानेश्वर कांबळे - राष्ट्रीय महासचिव, बाबूराव नेरकर - राष्ट्रीय उपाध्यक्ष, हरिश पाचकोरे - राष्ट्रीय उपाध्यक्ष, प्रा. शशिकांत सोनवणे -

पान ३ वर

# संपादकिय

## हे शिवधनुष्य पेलायचे आहे!

आज दि. २४ सप्टेंबर २०२० रोजी बरोबर २५ वर्षे पूर्ण झाली राष्ट्रीय चर्मकार महासंघाला ! आणि आज २५ वर्षांनंतर राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या माध्यमातून अधिकृत RCM या ई-मासिकाचा पहिला अंक प्रकाशित करताना मला व आपणा सर्वांना अतिशय आनंद होत आहे. हे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मुखपत्र असून या माध्यमातून आपल्या समाजाच्या बातम्या जगातील प्रत्येक समाज बांधवांपर्यंत पोहोचवण्याचे व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे कार्य प्रत्येकापर्यंत घेऊन जाण्याचे साधन याद्वारे आपणास उपलब्ध झाले आहे. याचा माझ्या मनाला फारच मनस्वी आनंद होत आहे.

माझ्या समाज बांधव व भगिनींनो...

आपल्या महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांनी २४ सप्टेंबर १९९५ रोजी समाजातील सुंदर बापू तुपे, सौ. नंदिनी सौंदनकर, भानुदास विसावे तसेच मयत कै. तुकाराम गोतीसे, निवृत्ती आगवणे व काही हयात पण अर्ध्यावर साथ सोडून गेलेले समाज बांधव यांना बरोबर घेऊन समाजाला संघटित केले. आणि हा हा म्हणता त्याचा आपण पाहता हा संघटित समाजाचा वटवृक्ष तयार झाला. या खडतर प्रवासात नानांनी तन मन व धन लावून पाच वेळा महाराष्ट्राचा दौरा केला. या कामी प्रा. भाऊ दायदार, गजानन भटकर, खुशाल डवरे, हरिष पाचकोरे, ज्ञानेश्वर काटकर, अंबादास गवळी, ज्ञानेश्वर कांबळे, रवींद्र राजुस्कर, उमाकांत डोईफोडे, डॉ. जामठे, वसंतराव धाडवे, नाना बसेशंकर, शंकरराव पहाडे, विठ्ठलराव खेकडे, ज्ञानेश्वर काकडे, डॉ. बावणे, आत्माराम साबळे, देविदास खंदारे, एस. एस. पानझाडे, अशोक कांबळे, आनंद गवळी, सूर्यकांत गवळी, सुदाम लोखंडे, सतीश इसवे, रवी चापके, दिलीप गायकवाड, प्रा. जे. जी. लोहकरे, अशोक विजयकर, प्रा. रवी चापके, बी. टी. चव्हाण, ॲड. दशरथ इंगळे, राजकुमार बनसोडे, माधव गायकवाड, व्यंकटेश दुधाम्बे, राजाभाऊ जाधव, बी.टी. चव्हाण, ज्ञानोबा माने, युवराज इंगळे, गजानन डामरे, देवानंद तांडेकर, भरत भरतुने, भाऊसाहेब कांबळे, गोपाळ बच्छीरे, मधुकर वेताळ, रमेशचंद्र आहेर, माधव गायकवाड, शिवाजी साळवे, बाबुराव नेरकर, शशिकांत सोनवणे, दुर्वास कदम, मोहन गोरमे, वाल्मिक जगताप, प्रकाश अबनावे, श्यामकुमार अकोडे या व इत्यादी अनेक मान्यवर त्यामध्ये माजी आमदार व खासदार आनंदराव अडसूळ, आमदार बाळा नांदगावकर, सीताराम घनदाट, संदेश कोंडविलकर पूर्व उपमहापौर रमेश मेढेकर, अशोक माने, समाधान माने, पुरुषोत्तम राजगुरू, भाऊसाहेब कांबळे, नाना वेताळ व जगन्नाथ खाडे इ. समाज बांधवांनी नानांच्या या कार्याला वाहून घेतले. नानांच्या मागे ही सर्व मंडळी सावली सारखी उभी राहिली.

या कामी महिलाही मागे नाही राहिल्या. त्यांनाही नानांच्या समाजाविषयी असलेली तळमळ त्यावेळी दिसून आली. थोड्याच अवधीत काही रणरागिणी कमरेला पदर खोचून पुढे आल्या. नंदिनी सौंदनकर बरोबर उभ्या राहिल्या. त्यामध्ये सरोज बिसुरे, मीरा विरनारायण, अलका पवार, पुष्पाताई मोरे, पार्वतीबाई डांगे, मंगला वाकचौरे, सीमा राजगुरू, जयश्री अहिरे, शकुंतला सोनटक्के, शोभा गायकवाड, ज्योती इंगळे, संध्याताई इसाळकर, अर्चना राजगुरू, उर्मिला ढाकरे, वनिता इन्सुलकर, प्रिया खरात, कल्पना तुपसमुद्रे, प्रभावती अन्नपूर्णे, विद्याताई चापके, गौराताई जाटवे, मालती सावरकर इ. महिलांनी कंबर कसून नानांच्या विचारांची धुरा वाहण्याची जबाबदारी स्वीकारली.या रोपट्याचा एवढा मोठा महामेरू होईल असे कधीही वाटले नव्हते, पण काहीना समाजनेता म्हणवून घेण्याची हाव निर्माण झाली त्यांनी संघटित समाजाला धोका देऊन आपल्या वेगळ्या चुली मांडुन आपली समाजनेता होण्याची हौस भागवली. त्यामध्ये मा. बाबुराव माने, चंद्रकांत कांबळे, संजय खामकर, लक्ष्मण घुमरे, भैय्यासाहेब भिगाणे, राजन शिंदे व रविकिरण घोलप हे आहेत. आणि याचे अतीव दुःख आजही मनाला वेदना देत आहे. त्यांची चूक त्यांना आज ना उद्या कळल्याविना राहणार नाही.

शांताराम, आज तुला आशीर्वादासोबत याद्वारे मी मौल्यवान सल्ला देत आहे की, तू हे कार्य स्वीकारले आहे याला कधीही खंड पडू देऊ नकोस. तू हे शिवधनुष्य उचलले आहे ते पेलविण्याची रविदास तुला शक्ती देवो ! तसेच संघटनेतील जुन्या जाणत्यांचा सल्ला घेऊन पुढील वाटचाल कर! ज्यांनी या वटवृक्षाला पाणी घालून मोठे केले त्यांचा विसर पडून देऊ नको. त्यांची तुझ्यावर आहे त्यापेक्षा अधिक समाजावर व आदरणीय नानांवर श्रद्धा आहे....इतकंच !



**पंढरीनाथ पवार**
संपादकीय सल्लागार
98202 58049

लवकरच युवकांनी व्यापलेली मोठी संघटना म्हणून नावारूपाला येणारे देशातील पहिले संघटन म्हणून राष्ट्रीय चर्मकार महासंघ असेल. कार्यकर्त्यांच्या बळावरच तर संघटना मोठी होत असते. कार्यकर्ता हा संघटनेला मोठा करणारा असला तरी तो संघटनेपेक्षा लहान असावा लागतो. नेत्यांपेक्षा संघटना नेहमीच मोठी असते...

# संघटना महत्त्वाची!



## आर या पार

डॉ. शांताराम कारंडे

**ज्या समाजात आपण जन्माला येतो त्या समाजाची सेवा करणे हे त्या व्यक्तीचे परम कर्तव्य असते. ज्याला राजकीय महत्वकांक्षा असते तो व्यक्ती तर त्याची सुरुवात समाजसेवेतूनच करत असतो. समाजाची सेवा करणे हे बऱ्याच जणांचा आवडता विषय असतो. परंतु समाजसेवा करताना नक्की कुठल्या माध्यमातून करावी हे मात्र बऱ्याच जणांना ज्ञात नसते. कधी कधी चांगला कार्यकर्ता हा चुकीच्या नेत्याच्या नादी लागतो, तर कधी कधी चुकीचा कार्यकर्ता चांगल्या नेत्याच्या हाती असतो. परंतु अशा गोष्टी जास्त काळ टिकत नसतात. जो हुशार, बुद्धिवान नेता असतो त्याला उशिरा का होईना पण चांगला कर्तृत्ववान कार्यकर्ता भेटतोच. ज्या नेत्यांचे विचार मोठे असतात, मनाचा मोठेपणा ज्याच्याकडे असतो अशा नेत्याला एक ना एक दिवस चांगल्या बुद्धीची, ब्रॉड माईंडेड कार्यकर्ते / पदाधिकारी लाभतात.**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ ही एक अशी संघटना आहे की, ज्याच्याकडे मोठ्या मनाचा, सर्वांना आपलं समजणारा आणि कुणाविषयीही वाईट न चिंतणारा आणि कुणालाही न दुखवणारा नेता लाभला आहे. त्या नेत्याविषयी इतर लोक ज्यांची लायकी नाही तेही माघारी वाईट बोलताना आम्ही ऐकलं आहे. मात्र त्याचवेळेस हा नेता मात्र ऐकून सोडून देत, त्याला प्रतिउत्तर न देता फक्त हसून सोडून देताना आम्ही अनुभवलंय! आणि म्हणूनच अशा नेत्याबरोबर काम करताना आमची मान अभिमानाने ताठ होते. आम्हाला सदैव अभिमानच नव्हे तर गर्व आहे की आम्ही आदरणीय नानांचे कार्यकर्ते आहोत. ज्यांना आम्ही समाजबांधव आदराने नाना म्हणतो तेच महाराष्ट्र राज्याचे माजी समाजकल्याण मंत्री मा. श्री. बबनराव घोलप होय!

समाजात इतर अनेक संघटना आहेत. अनेक ऐक्य झालेले आहेत. परंतु गावागावात, खेडोपाडी ज्या संघटनेचे जाळे विणले गेले आहे ती एकमेव संघटना म्हणजे राष्ट्रीय चर्मकार महासंघ! आजच्या घडीला देशातील सर्वात मोठी चर्मकार संघटना म्हणून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचेच नाव आहे. अशा संघटनेत आता नवीन युवक येण्यास उत्सुक आहेत हे पाहून मनाला आनंद वाटतो. देशातील सर्वात जास्त म्हणजे जवळ जवळ ७५०० पदाधिकारी, १०० पेक्षा अधिक राज्य व राष्ट्रीय पदाधिकारी आणि लाखो कार्यकर्ते असलेली संघटना म्हणजेच राष्ट्रीय चर्मकार महासंघ ! सर्वात प्रथम स्वतःची वेबसाईट असलेली संघटना म्हणजेच राष्ट्रीय चर्मकार महासंघ !

लवकरच युवकांनी व्यापलेली मोठी संघटना म्हणून नावारूपाला येणारे देशातील पहिले संघटन म्हणून राष्ट्रीय चर्मकार महासंघ असेल. कार्यकर्त्यांच्या बळावरच तर संघटना मोठी होत असते. कार्यकर्ता हा संघटनेला मोठा करणारा असला तरी तो संघटनेपेक्षा लहान असावा लागतो. नेत्यांपेक्षा संघटना नेहमीच मोठी असते त्याचे एक उदाहरण या ठिकाणी मी देऊ इच्छितो...

एक कार्यकर्ता होता, तो नेहमी त्याच्या संघटनेत सक्रिय होता. तो सर्वांना परिचित आणि आदरणीय होता. एक दिवस अचानक तो काही कारणास्तव निष्क्रीय झाला आणि संघटनेपासून दूर गेला. काही आठवड्यांनंतर अत्यंत थंडीच्या रात्री त्या संघटनेच्या प्रमुखांनी त्याला भेटायचं ठरवलं. प्रमुख त्या कार्यकर्त्यांच्या घरी गेले आणि तो कार्यकर्ता घरात एकटाच आढळला. शेकोटीत जळलेल्या लाकडाच्या ज्वाळासमोर बसून तो शेक घेत होता. अग्निही गरम होत होती. त्या कार्यकर्त्याने प्रमुखांचे फार शांतपणे स्वागत केले. दोघेही शांतपणे बसले होते. कोणीही एकमेकांशी बोलत नव्हते. फक्त शेकोटीतील अग्नि पेटत होता. थोड्या वेळाने प्रमुख काहीच न बोलता त्यांनी शेकोटीतील एक पेटते लाकूड उचलून बाजूला ठेवले आणि पुन्हा जागेवर बसले. कार्यकर्ता सर्व गोष्टींकडे लक्ष देत होता. मग त्याच्या लक्षात आले की, विभक्त लाकडाच्या आगीची ज्योत हळूहळू कमी होत आहे. काही वेळातच आग पूर्णपणे विझली. काही काळापूर्वी, ज्या लाकडाकडे एक चमकदार प्रकाश आणि ज्वाळा होती, त्याचा कोळसा झाला होता.

दरम्यान... दोघांनी एकमेकांना कमीतकमी शब्द बोलून अभिवादन केले. प्रमुखांनी निघण्यापूर्वी बाजूला उचलून ठेवलेले लाकूड उचलले आणि ते पुन्हा आगीच्या मध्यभागी ठेवले. ते लाकूड पुन्हा प्रज्वलित झाले आणि ज्वाला बनून जळू लागले आणि त्याभोवती पुन्हा प्रकाश आणि उष्णता पसरली. जेव्हा तो कार्यकर्ता प्रमुखांना सोडण्यासाठी दाराजवळ पोहोचला, तेव्हा तो प्रमुखांस म्हणाला, माझ्या घरी येऊन भेटल्याबद्दल तुमचे खूप खूप आभार ! आज आपण काहीही न बोलता एक सुंदर धडा शिकविला आहे. तो धडा म्हणजे, एकट्या व्यक्तीचे अस्तित्त्व गौण असते, जेव्हा ती संघटनेत कार्यरत असते तेव्हा ती चमकते. मात्र जेव्हा ती संघटनेपासून विभक्त होते तेव्हा ती विझून तिचा कोळसा होतो. ज्यांची ओळख संघटनेनेच बनविली आहे त्यांच्यासाठी संघटना सर्व काही असते. म्हणून संघटना महत्वाचीच !!

9820158885
dr.shantaramkarande@gmail.com

संपादक मंडळ

**पंढरीनाथ पवार** संपादकीय सल्लागार **डॉ.शांताराम कारंडे** संपादक **जयवंत बामणे** कार्यकारी संपादक
**सहसंपादक :** रविंद्र राजुस्कर, दत्तात्रय गोतिसे, रोहीदास बनसोडे, डॉ गणेश बोरकर, मारुती शिवदास
**उपसंपादक :** श्रीमती सरोज बिसुरे, पांडुरंग बाविस्कर, ज्ञानेश्वर बसेशंकर,

हे ई-मासिक वृत्तपत्र राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मुद्रक, संपादक डॉ.शांताराम कारंडे यांनी प्रकाशक मे. सिध्दांत प्रकाशनातर्फे २२१/६, गीतगुंजन, सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (प), मुंबई- ६७ येथून डिजिटली प्रकाशित केले. संपादकीय सल्लागार : पंढरीनाथ पवार email : adhikrutrcm@gmail.com (अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या आणि लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

■ पान १ वरुन... **महासंघाच्या विभागवार नियुक्त्या**

विश्वासात घेतील असे ठरले. खालीलप्रमाणे हे विभाग व त्यांचे कॅबिनेट सल्लागार सदस्य असतील :

**१) राष्ट्रीय चर्मकार महासंघ–अन्याय, अत्याचार निर्मूलन विभाग :**
हा विभाग शक्यतो ज्या ठिकाणी समाजबांधवांवर अन्याय, अत्याचार होतील त्या स्थळी तत्काळ पोहोचून परिस्थिचा आढावा घेईल. त्यानंतर निषेध/निवेदन, मोर्चा, आंदोलन याची दिशा ठरविण्यासाठी पुढाकार घेईल. स्थानिक जिल्हा व तालुका - गाव पातळीवरील सर्व पदाधिकारी यांचे सल्ले व मार्गदर्शन घेऊन समाजाची सेवा करतील. या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी श्री. भानुदास विसावे, श्री. माधव गायकवाड, श्री. नितीन शेरखाने व संजयबाबा शिंदे यांची नियुक्ती करीत आहे.

**२) राष्ट्रीय चर्मकार महासंघ– रोजगार व स्वयंरोजगार विभाग :**
या विभागाचे प्रमुख काम म्हणजे समाजातील गटई चर्मकार, बचत गट, शासकीय योजनांचा समाजबांधवांना लाभ मिळवून देणे, सहकार, खादी व उद्योग धंद्यांना चालना देणे तसेच बिजनेस क्लब स्थापन करून समाजातील अनेक उद्योजकांना संघटित करणे. या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी श्री. ज्ञानेश्वर कांबळे, उमाकांत डोईफोडे, काशीनाथ गवळे व फकीर राव मोरे यांची नियुक्ती करीत आहे.

**३) राष्ट्रीय चर्मकार महासंघ– प्रचार व प्रसार माध्यम :**
या विभागाचे प्रमुख काम म्हणजे समाजातील विविध समस्यांचे निवेदन बनवणे व देणे, शासकीय पत्रव्यवहार करणे, संघटनेचा तळागाळातील समाजबांधवांपर्यंत प्रचार व प्रसार करण्यासाठी योजना आखणे, कार्यक्रमांची प्रसिद्धी करणे, प्रोटोकॉल बनविणे, परिपत्रक काढणे व प्रवक्ते घडविणे. या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी डॉ. शांताराम कारंडे, श्री. रोहिदास बनसोडे, पांडुरंग बाविस्कर, ज्ञानेश्वर बसेशंकर, जयवंत बामणे, मारुती शिवदास व गणेश बोरकर यांची नियुक्ती करीत आहे.

**४) राष्ट्रीय चर्मकार महासंघ – न्यायालयीन विभाग :**
या विभागाचे प्रमुख काम म्हणजे समाजातील कोणताही घटकांवर अन्याय, अत्याचार झाल्यास त्वरित कायदेशीर कारवाई करण्यासाठी पुढाकार घेणे, कोर्टात वकील उभा करणे, कायदेशीर मार्गदर्शन करणे.या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी माजी आमदार ॲड. रामचंद्र अवसरे, माजी आमदार ॲड. रमेश बुंदेले, ॲड. आनंद गवळी, ॲड. विनोद सांगवीकर, ॲड. सुमित पाचखंडे, यांची नियुक्ती करीत आहे.

**५) राष्ट्रीय चर्मकार महासंघ– शासकीय कर्मचारी विभाग :**
या विभागाचे काम म्हणजे प्रत्येक शासकीय कार्यालयात आपली संघटना बनविणे, युनियन बनविणे तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या बढती/भरती/रोष्टर बाबत जनजागृती व त्यांच्या हितासाठी विविध योजनां आखणे, शासकीय कर्मचाऱ्याला योग्य न्याय मिळवून देणे. या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी श्री. रवींद्र राजुस्कर, श्री. मधुकर वाघ, श्री. दत्ता दुर्शिंग, श्री. दिलीप गोविंद व साहेबराव जाधव यांची नियुक्ती करीत आहे.

**६) राष्ट्रीय चर्मकार महासंघ– सामाजिक प्रबोधन विभाग :**
या विभागाचे प्रमुख काम म्हणजे समाजातील सर्व घटकांना एकत्र आल्यानंतर प्रबोधनाच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन करणे. या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी सुर्यकांत गवळी, पंढरीनाथ पवार, शिवाजीराव साळवे, सुरेश पवार, ज्ञानेश्वर बसेशंकर, दत्तात्रय शिंदे, रामदास पठाडे यांची नियुक्ती करीत आहे.

**७) राष्ट्रीय चर्मकार महासंघ– शिक्षक व शिक्षकेतर विभाग :**
या विभागाचे प्रमुख काम म्हणजे समाजातील शिक्षक, प्राध्यापक, शैक्षणिक क्षेत्रातील समाजबांधवांचे संघटन करणे, विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळण्यासाठी मार्गदर्शन करणे.
या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी प्रा. शशिकांत सोनवणे सर, प्रा. गोपालसिंह बच्छीरे, श्री. लीलाधर कानडे व प्रा. दत्ता खंदारे प्रा. बापुसाहेब अडसुळ, डॉ. श्रीप्रभू चापके, प्रा. मिनाक्षी पानझडे यांची नियुक्ती करीत आहे.

**८) राष्ट्रीय चर्मकार महासंघ– विवाह मंडळ विभाग :**
या विभागाचे प्रमुख काम म्हणजे समाजातील विवाहोत्सुक युवक - युवतींना वधू वर सूचक विवाह मंडळाच्या माध्यमातून एकत्र आणणे, विवाह जमवून देणे व तालुका पातळीवर विवाह मंडळाची स्थापना करून समाज एकत्र जोडणे.
या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी श्री. बाळकृष्ण कांबळे, श्री. सुदाम लोखंडे, श्री. मोहन गट्रे व श्री. सुनील भोळे यांची नियुक्ती करीत आहे.

**९) राष्ट्रीय चर्मकार महासंघ– तक्रार व निवारण विभाग :**
या विभागाचे प्रमुख काम म्हणजे समाजातील/संघटनेतील निर्माण झालेले वादविवाद मिटवणे, पदाधिकाऱ्यांच्या विविध तक्रारींचे निवारण करणे व पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वय घडवून आणणे.
या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी श्री. दत्तात्रेय गोतिसे, श्री. भाऊसाहेब कांबळे, श्री. भरत बरधूने, श्री. प्रशांत कांबळे, श्री. गजानन भटकर यांची नियुक्ती करीत आहे.

**१०) राष्ट्रीय चर्मकार महासंघ– महिला सक्षमीकरण विभाग :**
या विभागाचे प्रमुख काम म्हणजे समाजातील महिला चर्मकार भगिनींचा बचत गट करणे, त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, सहकार, खादी व लघुउद्योग धंद्यांना चालना देणे तसेच महिलांना सक्षम बनवणे.
या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी श्रीमती सरोज बिसुरे, सौ. संगीता खोदाना, सौ. मनीषा तिखे, सौ. मीना भागवत, सौ. शोभा कानडे, सौ. दीपाताई भोईर - घोलप, प्रभावती अन्नपूर्वे यांची नियुक्ती करीत आहे.

**११) राष्ट्रीय चर्मकार महासंघ– साहित्य व संवर्धन विभाग :**
या विभागाचे प्रमुख काम म्हणजे समाजातील विविध साहित्यिक, पत्रकार, लेखक व कवी यांचे संघटन करणे. संत शिरोमणी रवीदासांच्या साहित्याचा प्रसार करणे, मार्गदर्शक पुस्तिका, विशेषांक काढणे, साहित्य सेवा करणे.
या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी प्रा. शशिकांत सोनवणे, डॉ. शांताराम कारंडे, डॉ. गोपालसिंह बच्छीरे व श्री. भाऊ दायदार यांची नियुक्ती करीत आहे.

**१२) RCM बिजनेस क्लब :**
या विभागाचे/क्लबचे मुख्य ध्येय्य व उद्देश हा असेल की चर्मकार समाजातील उद्योजकांना एकत्र आणणे, त्यांच्या माध्यमातून रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करणे, प्रतिष्ठित उद्योजकांच्या सहकार्याने स्वयंरोजगाराची निर्मिती करून गरीब उद्योगांना चालना देणे.
या विभागाच्या कॅबिनेट सल्लागार सदस्यपदी श्री. ज्ञानेश्वर कांबळे, डॉ. शांताराम कारंडे, श्री. राजेश खाडे, श्री. प्रकाश बाविस्कर व श्री. नचिकेत धाकराव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

■ पान १ वरुन...

# महासंघाचे ऑनलाईन अधिवेशन...

रविंद्र राजूस्कर-राष्ट्रीय प्रवक्ता, उमाकांत डोईफोडे -राष्ट्रीय सचिव, नंदिनी सौंदनकर-राष्ट्रीय उपाध्यक्षा, सरोज बिसुरे-राष्ट्रीय म.सचिव, सूर्यकांत गवळी- राष्ट्रीय उपाध्यक्ष, ॲड. आनंद गवळी-राष्ट्रीय उपाध्यक्ष, सुदाम लोखंडे-राष्ट्रीय उपाध्यक्ष, माधवराव गायकवाड-प्रदेशाध्यक्ष, डॉ. शांताराम कारंडे- प्रदेश कार्याध्यक्ष, भरत कारंडे- प्रदेश उपाध्यक्ष, दत्तात्रेय गोतिशे-प्रदेश सचिव, दिलीप कानडे -उत्तर प्रदेश अध्यक्ष, गोपालसिंह बच्छेरे-मराठवाडा अध्यक्ष, भिवसेन आहिरे- कार्यकारिणी सदस्य, गजानन भटकर-पूर्व विदर्भ अध्यक्ष, अंबादास गवळी-राज्य उपाध्यक्ष, संजयबाबा शिंदे- प. महाराष्ट्र अध्यक्ष, प्रा. डी. आर. माळी- प. विदर्भ अध्यक्ष, नितीन शेरखाने-युवा प्रदेश अध्यक्ष, दिपा भोईर-घोलप-उ. महाराष्ट्र अध्यक्षा, शोभा कानडे-राज्य कार्यकारणी सदस्य, रोहिदास बनसोडे-प्रदेश प्रवक्ते, जयश्री विसावे-राज्य उपाध्यक्षा महिला, बाबूराव नेरकर-राज्य उपाध्यक्ष, गौतम बळवंते- कोकण सचिव तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकारी मिळून दोनशे ते अडीचशे जण उपस्थित होते. चर्मकार समाजाच्या उन्नतीसाठी सर्वप्रथम आयोजित हे ऑनलाइन अधिवेशन अत्यंत यशस्वीपणे पार पडले.




## महासंघाचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष दिलीप तिजवीज यांचे दु:खद निधन

**नंदुरबार (प्रतिनिधी) :**
राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष कै. दिलीपभाऊ तिजविज यांचे दुःख निधन झाले. ते समाजाचे तर खरे सेवक होतेच पण आदरणीय नानांचे अत्यंत विश्वासू सहकारी होते. कुठलाही लोभ न ठेवता त्यांनी शेवटपर्यंत राष्ट्रीय चर्मकार महासंघाची प्रामाणिक सेवा केली. असा सेवक गेल्याने राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे भरून न येणारे नुकसान झाले आहे.
संत शिरोमणी गुरू रविदास महाराज त्यांच्या आत्म्यास सदगती देवो! त्यांना राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे अश्रूंनी भरलेली भावपूर्ण श्रद्धांजली !

## महासंघाचे अंबड तालुकाध्यक्ष भीमराव राक्षे यांना जबरी मारहाण



अंबड (प्रतिनिधी) :
राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जालना जिल्हा कार्यक्षेत्रातील अंबड तालुकाध्यक्ष भीमराव राक्षे यांना त्यांच्या शेतात काम करत असताना दि. ९ ऑगस्ट २०२० रोजी बोरी गाव येथे त्यांच्याच ओळखीच्या ७ ते ८ नराधमानी किरकोळ कारणांवरून कुऱ्हाडीने वार करून जखमी केले. त्यावेळी रागाच्या भरात हातात येईल त्या लाकडाने, लाथा-बुक्यानी त्यांना जबर मारहाण करण्यात आली. इतकेच नव्हे तर त्या नराधमांनी भीमराव राक्षे व त्यांची पत्नी या दोघांना दिसेल तिथे लाथा बुक्क्यांनी मारले.
भीमराव राक्षे यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर घाटी येथे सध्या उपचार सुरु आहेत. त्यांच्यावर जीवे मारण्याचा प्रकार झाल्याचे पाहून ताबडतोब राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. बबनराव घोलप यांच्या आदेशाने प्रदेशाध्यक्ष माधवरावजी गायकवाड साहेब व जिल्हाअध्यक्ष दुर्गेश कुरील व चर्मकार समाजाचे तरुण तडफदार कार्यकर्ते गणेश पाचारे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अंबड युवा तालुका अध्यक्ष लक्ष्मण राक्षे, यांच्या प्रयत्नामुळे भादंसं ३०७ अन्वये, एट्रासिटीचा गुन्हा दाखला करण्यात आला.
या घटनेचा राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जाहिर निषेध करण्यात येत असून वेळ पडल्यास समाज बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे आंदोलन छेडण्यात येईल.

# गरीबाच्या मुला शाळा शिकतो कशाला?

**राज्यसरकारने जवळजवळ, पाच हजार सरकारी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्याने, सरकारचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. शाळा बंद करण्याचा निर्णय हा अचानक घेतला गेला नाही. हेही तेवढेच खरे आहे.**

बहुजन समाजातील लोक शिकले, शिकल्यामुळे वाचणे शक्य झाले, परंतु मेंदुचा योग्य वापर आणि स्वतः तर्क करत नसल्याने, देश मातीत चालला तरी, शिकलेल्या वर्गाला जाणीव राहली नाही. ज्यांना जाणीव आहे त्यांना प्रसिद्धी दिली जात नाही, म्हणून सत्य समाजापर्यंत पोहचत नाही. आज अनेक निर्णय घेऊन, सरकार लोकहिता विरोधात काम करताना दिसत आहे. ज्यांना व्यवस्थेचा अभ्यास आहे, त्यांना ह्या गोष्टीत नवल असे काही नाही. परंतु निर्णय मात्र घातकच आहेत याची जाणीव लोकांना होत नाही. ही जिवंत माणसाची लक्षणे नाहीत. जिवंत माणसाला, भावना, संवेदना असतात.

सरकारच्या चुकिच्या ध्येयधोरणा विरोधात, जर माणूस संवेदनशील होत नसेल, भावनिक होत नसेल तर तो माणुस संपलेला आहे असे गृहीत धरून, जागृत लोकांनी एकतेने लढा देणे आवश्यक आहे. जवळजवळ पाच हजार सरकारी शाळा बंद करण्याची वेळ का आली ? हे सगळं एकाच दिवशी घडले का? शाळेवर शिकवणाऱ्या शिक्षकाला खरचं याची जाणीव व गांभीर्य आहे का? असे अनेक प्रश्न डोक्यात येतात. शाळा बंद करण्यामागे सुद्धा व्यवस्था आहे हि व्यवस्था जो पर्यंत लक्षात येणार नाही तोपर्यंत आपण आपल्या येणाऱ्या पिढीला आदर्श जीवन देऊ शकणार नाही.

शाळा बंद करण्यामागे व्यवस्था आहे हे वाचुन अनेकांना नवल वाटेल, पण शिक्षण अर्थात शाळा बंद करण्यामागे व्यवस्था कारणीभूत कशी हे आपण समजून घेणे महत्त्वाचे आहे. मनुस्मृतीच्या काळात संविधानाच्या अगोदर बहुजन समाजाला शिक्षण, संपत्ती, स्वातंत्र्य, नोकरी, न्याय, समानता, सत्ता, या गोष्टी मिळवण्याचा अधिकार नव्हता. माणुस म्हणून जन्माला यायचे पशू म्हणून जगायचे आणि लाचार होऊन मरायचे हीच ती व्यवस्था होती. अशी मानवी जिवनाला कलंक लालणारी माणसाला माणसाचा दर्जा न देणारी घाण समाजामध्ये याच व्यलस्थेने केली होती. हि व्यवस्था उलथून टाकण्यासाठी बुद्धांपासुन तर अलिकडे तुकडोजी महाराज, गाडगेबाबा यांच्या पर्यंत व्यवस्थेवर वार करण्याचे काम केले. परंतु व्यवस्थेने हजारो वर्षापासून मानसाला माणसिक गुलाम बनवले आहे म्हणून माणसामध्ये परिवर्तन ही आव्हानात्मक बाब आहे. आधुनिक भारतामध्ये सुद्धां बहुजनांना शिक्षणाचा अधिकार नव्हता तो अधिकार महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांनी अंगावर दगडमाती घेऊन आम्हाला मिळून दिला, शाहु महाराज यांनी आरक्षण दिले, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, आरक्षण आणि संरक्षण बहूजन समाजाला मोफत दिले. संविधानामुळे आम्ही शिकलो मोठ मोठ्या नोकरीवर लागलो हिच बाब व्यवस्थेच्या पचनी पडणारी नाही. शिक्षणामुळे सर्वांगीण विकास व्हायला सुरवात झाली, दरी डोंगरावर राहणारा आदिवासी शाळेत गेला, सावलीचा बाट होणारा शहरात गेला. काल पर्यंत आपली गुलामी करणारा सलामी घेणारा बनला.

**क्रमशः (उर्वरित पुढील भागात...)**

लेखक : **मारुती रघुनाथ शिवदास सर**
कॅबिनेट सल्लागार-प्रचार आणि प्रसार : रा. च. महासंघ
९८८१६६१०५०

# गटई कामगारांनी आत्मनिर्भर योजनेचा लाभ घ्यावा!

**मुंबई प्रतिनिधी :**

महाराष्ट्र राज्याच्या वतीने महाराष्ट्रातील कष्टकरी गटई कामगारांना एक आनंदाची बाब म्हणचे पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर योजना आलेली आहे. ज्या गरीब व होतकरू ज्यांचे हातावर पोट आहे अशा फेरीवाल्यासह सह चर्मकार गटई बांधवांचा समावेश करण्यात आलेला आहे. ही आत्मनिर्भर योजना रु. १००००/- (दहा हजार रुपये ) प्रत्येकाला कर्ज स्वरुपात मिळणार आहे. हीआत्मनिर्भर योजना महानगरपालिका, नगपालिका, नगर पचांयत क्षेत्रातील गटई बांधवांना लागू पडणार आहे. आत्मनिर्भर योजने अंतर्गत फेरीवाला व गटई कामगार यांना राष्ट्रीयकृत बँकेच्या माध्यमातून कर्ज स्वरूपात वितरीत करण्यात येणार आहे. या आत्मनिर्भर योजनेच्या कर्जाची समान १२ हप्त्यात परतफेड करावयाची आहे. वेळेवर हप्ते भरणाऱ्यांना अधिक ७% व्याजात लाभ मिळणार आहे. तसेच आपले बँकखाते, आधार कार्ड व मोबाईल नबंरशी लिंक झालेले असायला पाहिजे. प्रत्येकांला फार्म ऑनलाईन भरावा लागणार आहे.आधार कार्ड, पॅन कार्ड , बँक पासबुक, पासपोर्ट साईझ दोन फोटो इ. कागदपत्र लागणार आहेत. सदर योजना आपल्या महानगरपालिका, नगपालिका, नगर पंचायत मध्ये जाऊन सविस्तर माहिती घेवुन कागदपत्राची पुर्तता करुन सुविधा केंद्रात ऑनलाईन फार्म भरावा फार्म भरल्यावर आपणास बँकेशी फार्म लिंक असणाऱ्या आपल्या मोबाईल वर ( UPI ID password ) नंबर येईल तो जपुन ठेवणे. त्यानंतर तो नंबर बँकेत द्यावा लागेल. अधिक माहितीसाठी राजेश खाडे, अशोक देहरे व राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या जिल्हाध्यक्ष यांना संपर्क साधावा.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाची शिक्षक संघटनेच्या कॅबिनेट सल्लागार समितीच्या नियुक्त्या जाहीर!

**नाशिक (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व अध्यक्ष मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या आदेशाने शिक्षक व शिक्षकेतर विभागाच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाची शिक्षक संघटना महाराष्ट्र कॅबिनेट सल्लागार सदस्य समिती खालीलप्रमाणे असेल.

**मुख्य कॅबिनेट सल्लागार :**
प्रा. शशिकांत सोनवणे - पुणे

**कॅबिनेट सल्लागार सदस्य :**
मा. डॉ. गोपालसिंह बच्छीरे - औरंगाबाद
मा. श्री. लीलाधर कानोडे - नागपूर
मा. डॉ. प्रा. दत्ता खंदारे - नांदेड
मा. प्रा. बापूसाहेब अडसूळ-सोलापूर
मा. डॉ. श्रीप्रभु चापके-अकोला
मा.प्रा.मीनाक्षी पानझडे-यवतमाळ



## कॅबिनेट सल्लागार समिती सदस्यांचा भव्य सामाजिक सत्कार

**अकोला (प्रतिनिधी):**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ अकोला जिल्हा महानगर मध्ये सर्किट अकोला येथे मोठ्या उत्साहात महाराष्ट्र कॅबिनेट सल्लागार समिती सदस्य मा.प्राचार्य डॉ. श्रीप्रभु चापके सर,मा.सौ.डॉ. मीनाक्षीताई पानझाडे,मा.डॉ. गणेशराव बोरकर सर,मा.गजाननभाऊ भटकर,मा.नरेंद्र चिमणकर सर यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.पांडूरंगजी वाडेकर होते प्रमुख उपस्थित मा.रामभाऊ उंबरकर, मा.प्रकाशभाऊ ठोंबरे जिल्हाध्यक्ष, शिवलालभाऊ इंगळे महानगर अध्यक्ष,मा.निलेश बोरकर युवा अध्यक्ष ग्रामीण,मा. सुमित पानझाडे युवा अध्यक्ष शहर, मा.के.टी.पदमने, मा.रामभाऊ ताजने, मा.नरहरी राजगुरु, मा.छायाताई इंगळे महिला शहर अध्यक्षा, मा.किशोर काकडे तालुका अध्यक्ष,मा.योगेश इंगळे, मा.संतोष इंगळे, मा.छोटु डांगे हे उपस्थित होते.

राष्ट्रीय नेते बबनरावजी घोलप यांनी लावलेल राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे रोपटे त्याला पाणी घालण्याचे काम समाजाचे असुन आहे यापुढे आमच्यावर नाना साहेबांनी टाकलेली जबाबदारी आम्ही समाज संघटनेसाठी व समाजावर अन्याय अत्याचार होऊ देणार नाही असे उदगार मान्यवर सत्कार मुर्ती प्राचार्य डॉ. श्रीप्रभु चापके, गणेशराव बोरकर, सौ.मीनाक्षी पानझाडे, नरेंद्र चिमणकर, पांडूरंगजी वाडेकर, रामभाऊ उंबरकर यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. गणेशराव इंगळे यांचे वाढदिवसानिमीत्त यांना संघटणेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमामध्ये सौ.शांताबाई वाडेकर यांची महिला आघाडीच्या शहरउपाध्यक्षपदी व सतिश इंगळे यांची राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. व समाज बांधव उपस्थित होते.

## महासंघाच्या सामाजिक प्रबोधन विभागाच्या नियुक्त्या जाहिर

**नाशिक (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा संस्थापक व अध्यक्ष मा. श्री. बबनराव ( नाना) घोलप यांनी आपल्या संघटनेच्या सामाजिक प्रबोधन विभाग विभागाच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. सदर विभागाची महाराष्ट्र कॅबिनेट सल्लागार सदस्य समिती खालीलप्रमाणे असेल.

**मुख्य कॅबिनेट सल्लागार :**
सूर्यकांत गवळी - पुणे

**कॅबिनेट सल्लागार सदस्य :**
श्री. पंढरीनाथ पवार- मुंबई
श्री. ज्ञानेश्वर बसेशंकर- नागपूर
श्री. सुरेश पवार- ठाणे
श्री. शिवाजीराव साळवे-अहमद नगर
ऍड. दशरथ इंगळे- जालना
प्रा. दत्तात्रय बंडू शिंदे- पुणे




## महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदने सादर



प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. शांताराम कारंडे व उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष मा. दादाभाऊ माने मुंबई उपनगर जिल्हाधिकारी व बोरिवली तालुका तहसीलदार यांना निवेदन देताना...

**मुंबई (प्रतिनिधी):** राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने गटई कामगारांना शासनातर्फे अनुदान मिळावे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'राजगृहावर' हल्ला करणाऱ्या आरोपींना कठोर शासन करणेबाबत अशी दोन वेगवेगळी निवेदने महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी यांना देण्यात आली.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्षांनी मंगळवार दि. १४ जुलै २०२० रोजी सकाळी ११ वाजता आपापल्या जिल्ह्यातील मा. जिल्हाधिकारी कार्यालयात पत्र तयार करून जमा केले.

मुंबईतील दादर येथील परमपूज्य, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुंबईस्थित राजगृह या निवासस्थानी मंगळवारी भ्याड हल्ला झाला असून या घटनेचा राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे निषेध करण्यात आला. तसेच हा हल्ला करणाऱ्या समाजकंटकांवर महाराष्ट्र शासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी या संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, माजी समाजकल्याणमंत्री, मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

त्या वेगवेगळ्या दिलेल्या निवेदनात १) शासनातर्फे गटई चर्मकाराला ताबडतोब आर्थिक मदत करणेबाबत, आणि २) डॉ. आंबेडकर यांच्या राजगृह या निवासस्थानी झालेल्या भ्याड हल्ल्यातील आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने देण्यात आलेले निवेदन मुंबई, पुणे, ठाणे, रायगड, नाशिक, अहमद नगर, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, सांगली, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, लातूर, हिंगोली, बुलढाणा, बीड, जालना, जळगाव, चंद्रपूर, चाळीसगाव, उस्मानाबाद इ. जिल्ह्यातून देण्यात आले.

काय ???



अधिकृत RCM ईमासिकाचे
वार्षिक सभासद व्हायचंय?
मग वाट कसली बघतायं? लगेच संपर्क साधा :
आर.सी.एम. प्रचार आणि प्रसार विभाग :
९८२०१५८८८५ / ७७२२०७९१२५